Shivaji College Hingoli Dist Hingoli

Peer Reviewed Referred
and UGC Listed Journal
(Journal No. 40776)

ISSN 2277 - 5730
AN INTERNATIONAL MULTIDISCIPLINARY
QUARTERLY RESEARCH JOURNAL

# AJANTA

## SPECIAL ISSUE
## "INDIAN FOREIGN POLICY AND PRESENT SCENARIO"



Volume-VIII, Issue-I
January - March - 2019
Marathi Part - I

IMPACT FACTOR / INDEXING
2018 - 5.5
www.sjifactor.com

Ajanta Prakashan

PRINCIPAL
Shivaji College
Hingoli. Dist. Hingoli

Shivaji College Hingoli Dist. Hingoli

ISSN 2277 - 5730

AN INTERNATIONAL MULTIDISCIPLINARY QUARTERLY RESEARCH JOURNAL

# AJANTA

Volume - VIII Issue - I Marathi Part - I January - March - 2019

Peer Reviewed Referred and UGC Listed Journal

Journal No. 40776

ज्ञान-विज्ञान विमुक्तये

IMPACT FACTOR / INDEXING
2018 - 5.5
www.sjifactor.com

❖ EDITOR ❖

Asst. Prof. Vinay Shankarrao Hatole
M.Sc (Maths), M.B.A. (Mktg.), M.B.A. (H.R.),
M.Drama (Acting), M.Drama (Prod. & Dir.), M.Ed.

❖ PUBLISHED BY ❖

Ajanta Prakashan
Aurangabad. (M.S.)

PRINCIPAL
Shivaji College
Hingoli. Dist. Hingoli

VOLUME - VIII - ISSUE - I - JANUARY - MARCH - 2019
AJANTA - ISSN 2277 - 5730 - IMPACT FACTOR - 5.5 (www.sjifactor.com)

# CONTENTS OF MARATHI PART - I



| अ.क्र. | लेख आणि लेखकाचे नाव | पृष्ठ क्र. |
|---|---|---|
| २६ | भारत आणि अमेरिका संबंध<br>प्रा. सुनिता शरद इंगळे | १२२-१२३ |
| २७ | भारतीय परराष्ट्रीय धोरणासमोरील आव्हाण - दहशतवाद<br>श्री. लक्ष्मण शेषराव गोरे<br>डॉ. किशोर सुर्यवंशी | १२४-१२८ |
| २८ | भारतीय परराष्ट्र धोरणासमोरील आव्हाने<br>डॉ. दारवंडे एस. एस. | १२९-१३२ |
| २९ | भारताची ब्रिक्स समूहातील विकासात्मक भूमिका<br>डॉ. राजाभाऊ भागवत गायकवाड<br>प्रा. डॉ. कैलास अर्जुनराव ठोंबरे | १३३-१३७ |
| ३० | सार्क आणि भारतीय परराष्ट्र धोरण<br>प्रा. राजेंद्र श्री. कोरडे | १३८-१४३ |
| ३१ | भारताच्या परराष्ट्र धोरणाची प्रासंगिकता : पंतप्रधान नरेंद्र मोदींचे परराष्ट्र धोरण<br>(आंतरराष्ट्रीय राजकारणातील भारताचा वाढता प्रभाव)<br>प्रा. डॉ. दिलीपसिंह निकुंभ | १४४-१४८ |
| ३२ | भारतीय परराष्ट्र धोरणाचे बदलते स्वरुप - एक अभ्यास<br>प्रा. डॉ. सुखनंदन ढाले | १४९-१५६ |
| ३३ | भारताचे परराष्ट्र धोरण सद्यस्थितीचा विश्वलेषणात्मक आढावा<br>प्रा. डॉ. बनसोडे विलास भारतराव | १५७-१६० |



PRINCIPAL
Shivaji College
Hingoli. Dist. Hingoli

...VIII, ISSUE-I - JANUARY - MARCH - 2019
...A - ISSN 2278 - 5730 - IMPACT FACTOR - 5.5 (www.sjifactor.com)

# भारतीय परराष्ट्र धोरणाचे बदलते स्वरुप – एक अभ्यास

प्रा. डॉ. सुखनंदन ढाले
राज्यशास्त्र विभाग प्रमुख, शिवाजी महाविद्यालय, हिंगोली.

प्रस्तावना

आजचे युग हे जागतिकीकरणाचे यूग आहे. या काळात कोणतेही राष्ट्र त्यापासून स्वतःला अलिप्त ... शकत नाही. आंतरराष्ट्रीय समुदायातील कोणतेही राष्ट्र इतर राष्ट्रापासून स्वतःला अलिप्त ठेवू शकत नाही. ... राष्ट्राला आपल्या विकासासाठी व गरजांसाठी इतर राष्ट्रावर अवलंबून राहावे लागते. आणि त्यासाठी ...राष्ट्र धोरण हे अतिशय महत्वाचे आहे.

स्वातंत्र्य भारताच्या परराष्ट्र धोरणाची मुळे राष्ट्रीय चळवळीने अंगिकारलेल्या तत्वामध्ये आणि ...धोरणामध्ये होती. वसाहतवादाला विरोध आणि आपल्या स्वातंत्र्यासाठी लढा उभारलेल्या लोकांना ...हानुभूती व पाठिंबा दर्शविणारा एक व्यापक दृष्टिकोण यामागे होता. 1947 नंतर स्वातंत्र्य भारताच्या ...राष्ट्र धोरणाचे निर्धारण केले गेले. या परराष्ट्र धोरणावर ऐतिहासिक परंपरेचा व सांस्कृतिकतेचा प्रभाव ...होता. हे शीत युध्दकालीन परराष्ट्र धोरण शांतता, विकास, निशस्त्रीकरण आणि परस्परावलंबित्व या चार तत्वावर आधारलेले होते. परंतू भारताचे शीतयुध्दोत्तर परराष्ट्र धोरण विचारसरणीपेक्षा राष्ट्रीय हितसंबंधना महत्व देणारे आहे. राजकीय हितसंबंधापेक्षा आर्थिक हितसंबंधांना या काळात महत्व प्राप्त झाले. त्याचबरोबर भारताने परराष्ट्र धोरणात आदर्शवादाऐवजी वास्तववादाला महत्व देण्यास प्रारंभ केला आहे.

शोधनिबंध लेखनाचा उद्देश

1) भारताचे शीतयुध्दोत्तरकालीन परराष्ट्र धोरण जाणून घेणे.
2) परराष्ट्र धोरणातील बदल अभ्यासणे.
3) भारताच्या परराष्ट्र धोरणाची वैशिष्टे जाणून घेणे.

परराष्ट्र धोरणाचा अर्थ

परराष्ट्र धोरण निर्मितीची प्रक्रिया सर्वसमावेशक प्रक्रिया आहे. परराष्ट्र धोरणाची निश्चिती करणे ही आधुनिक काळातील महत्वाची गरज मानली जाते. या परराष्ट्र धोरणाचा अर्थ काही अभ्यासकांनी स्पष्ट केला आहे तो पुढीलप्रमाणे,

PRINCIPAL
Shivaji College
Hingoli. Dist. Hingoli

1) जॉर्ज मॉडलस्की (George Modelski):- "परराष्ट्र धोरण म्हणजे अशी व्यवहार पध्दती की, तिच्याव्दारे एक राज्य दुसऱ्या राज्याला आपल्या इच्छेनूसार व्यवहार करण्यास प्रवृत्त करणे किंवा आपला व्यवहार आंतरराष्ट्रीय परिस्थितीशी जुळवून घेणे होय."[1]

2) पिटमन पिटर (Pitman Peter):- "आंतरराष्ट्रीय संबंधात राष्ट्रीय योजना व विदेश सेवा याची कार्यवाही आणि राष्ट्रीय उद्दिष्टांच्या पुर्तीसाठी केलेले प्रयोजन म्हणजे परराष्ट्र धोरण होय."[2]

## परराष्ट्र धोरणाचे स्वरुप

भारताच्या परराष्ट्र धोरणाचे स्वरुप ठरवणे कठीण कार्य आहे. कारण धोरणात वारंवार बदल होत जातात. जे निर्णय घेतात किंवा धोरण निर्धारण करतात त्यांच्यावर अनेक घटकांचा प्रभाव कार्य करीत असतात. त्यावरुन परराष्ट्र धोरणाचे स्वरुप स्पष्ट होते.

1) परराष्ट्र धोरणाचे निर्धारण राज्यातील सर्वोच्च सत्ता करीत असते.

2) परराष्ट्र धोरणात राष्ट्रीय आकांक्षा, तत्वज्ञान आणि लोकमत यांचे प्रतिबिंब पडलेले असते.

3) परराष्ट्र मंत्रालय आणि परराष्ट्र सेवा या माफ़त परराष्ट्र धोरणाची अंमलबजावणी केली जाते.

## परराष्ट्र धोरणाचे निर्धारक घटक

देशाचे परराष्ट्र धोरण निश्चित करीत असताना त्या देशाच्या परराष्ट्र धोरणाला प्रभावित करणारे जे घटक असतात त्या घटकांना परराष्ट्र धोरणाचे निर्धारीत घटक म्हणतात. यामध्ये भौगोलिक घटक, ऐतिहासिक स्थान, राजकीय परंपरा, लष्करी सामर्थ्य, राष्ट्रीय चारित्र्य, अंतर्गत वातावरण, आंतरराष्ट्रीय परिस्थिती, राजकीय संस्था, निर्णय घेणाऱ्याचे व्यक्तिमत्व इ. घटकांचा प्रभाव पडत असतो. यामधून देशाचे परराष्ट्र धोरण निर्धारीत होत असते.[3]

## भारताच्या परराष्ट्र धोरणाचे निर्धारण व विकास

भारताच्या परराष्ट्र धोरणाचा विकास प्रामुख्याने तीन टप्प्यामध्ये झाला आहे. यामधील पहिला टप्पा हा 1885 ते 1947 म्हणजे भारताच्या स्वातंत्र्य पूर्वकाळातील परराष्ट्र धोरणाचा आहे. दूसरा टप्पा 1947 ते 1990 पर्यतचा म्हणजे शीतयुध्दाच्या अखेरपर्यतच्या काळातील टप्पा आहे. या टप्प्याला भारताचे शीतयुध्दकालीन परराष्ट्र धोरण किंवा नेहरुवादी परराष्ट्र धोरण असे म्हटले जाते. भारताच्या परराष्ट्र धोरणाचा धोरणांचा तिसरा टप्पा हा शीतयुध्दोतर काळातील म्हणजे 1991 ते आजपर्यंतच्या परराष्ट्र

PRINCIPAL
Shivaji College
Hingoli. Dist. Hingoli

शोचा आहे. हे शीतयुध्दोत्तर परराष्ट्र धोरण महत्वाचे आहे. याला "पोस्ट नेहरुवियन पॉलिसी" म्हणतात. म्हणतात. या काळात आंतरराष्ट्रीय राजकीय समीकरणात बदल पडून आला आहे.[4]

शीतयुध्दोत्तर काळातील जागतिक परिस्थिती बदलली. अमेरिका-रशिया, पूर्वयुरोप आणि पश्चिम युरोप यांच्यामधील विचारसरणीवर आधारीत जो संघर्ष होता तो संपुष्टात येऊन त्याऐवजी सहकार्याचे धोरण स्विकारले. याच काळात जागतिकीकरणाच्या प्रक्रियेने जोर धरला होता. राष्ट्रामध्ये आर्थिक एकीकरणाची प्रक्रिया वाढीस लागली. विभागीय पातळीवर अनेक राष्ट्रे एकत्र येऊ लागले. राष्ट्रविचारसरणीपेक्षा, राजकीय हितसंबंधापेक्षा आर्थिक आणि व्यापारी हितसंबंधांना प्राधान्य देऊ लागले. राष्ट्र ही संकल्पना आजपर्यंत राजकारणात प्रभावी असल्याने राष्ट्राच्या दृष्टिकोनातून आंतरराष्ट्रीय धोरणाचा व आर्थिक हितसंबंधाचा विचार केला जात होता. परंतू वर्तमान स्थितीत राष्ट्रापेक्षा इतर काही घटक प्रभावी ठरु लागले ते घटक एवढे महत्वाचे बनले की, त्यांनी त्या राष्ट्राचे परराष्ट्र धोरण आणि आंतरराष्ट्रीय राजकारणाच्या दिशा ठरवण्यास सुरुवात केली. त्यांना राज्यक (नॉन स्टेट ॲक्टर्स) असे म्हणतात. उदा. एन.जी.ओ., विभागीय व्यापार संघ, आंतरराष्ट्रीय राजवटी, दहशतवादी संघटना, बहूराष्ट्रीय कंपन्या.[5]

**भारताच्या परराष्ट्र धोरणाचे बदलते स्वरुप**

1990 मध्ये रशियाचे विघटन झाले आणि त्याचा परिणाम शीतयुध्दाचा शेवट होण्यात झाला. या काळात देशाच्या परराष्ट्र धोरणाला बदलत्या जागतिक परिस्थितीतील बदलाचा प्रभाव पडण्यास प्रारंभ झाला. याला भारताचे परराष्ट्र धोरण पडण्यास प्रारंभ झाला. याला भारताचे परराष्ट्र धोरण अपवाद नाही. भारतानेही आंतरराष्ट्रीय राजकारणातील बदलते प्रवाह लक्षात घेऊन आपल्या परराष्ट्र धोरणात बदल करण्यात सुरुवात केली. या बदलाचा प्रारंभ पी.व्ही. नरसिंहराव यांच्या कालखंडापासून सुरु झाला. या बदलत्या परराष्ट्र धोरणाचे स्वरुप पुढीलप्रमाणे सांगता येते. 1) 1991 ते 1998 - या कालखंडातील भारताचे परराष्ट्र धारेण आर्थिक उद्दिष्टे समोर ठेवून निर्वाचित केलेले होते. यामुळे या काळातील परराष्ट्र धोरणामध्ये राष्ट्रीय हितसबंधापेक्षा आर्थिक हितसबंधांना महत्व होते. त्यासाठी पंतप्रधान पी.व्ही. नरसिंहराव यांच्या सरकारने भारताचे नवे आर्थिक धोरण 1991 मध्ये लागू केले. यानूसार भारताने आर्थिक उदारीकरण, खाजगीकरण व जागतिकीकरणाचा कार्यक्रम हाती घेतला आणि तो यशस्वी करण्यासाठी परराष्ट्र धोरणाचा वापर करण्यास सुरुवात केली होती.[6]

PRINCIPAL
Shivaji College
Hingoli. Dist. Hingoli

**आर्थिक प्रश्न व दहशतवादावर विशेष भर**

1999 ते 2003 या कालखंडामध्ये भारताने आण्विक प्रश्न आणि दहशतवादावर विशेष भर दिला आहे. 1978 मध्ये भारताने अणूपरिक्षण केले. आणि स्वत:ला अण्वस्त्रधारी राष्ट्र म्हणून घोषित केले. हे करत असतांना सी.टी.पी.टी. (कॉम्प्रेहेन्सिव्ह न्यूक्लिअर नॉन प्रोलिफिरेशन ट्रीटी) आणि एन.टी.पी. (न्यूक्लिअर नॉन प्रोलिफिरेशन ट्रीटी) या करारावर भारताने काही आक्षेप नोंदवले व त्यावर स्वाक्षरी करण्यास नकार दिला. या काळात दोन्ही करारावर स्वाक्षऱ्या करण्यासंदर्भात भारत सरकारवर फार मोठा दबाव आला. तो दबाव भारताने फेटाळून लावला आणि सांगितले की, हे दोन्ही करार पक्षपाती असून जगातील बलाढ्य राष्ट्राचे हितसंबंध यामधून जोपासले जात आहेत. तसेच नि:शस्त्रीकरणाची भूमिका यामधून साध्य होऊ शकत नाही ही भूमिका भारताने घेतली.

भारताने दहशतवादाच्या प्रश्नाला परराष्ट्र धोरणामध्ये प्राथमिकता दिली. भारत-अमेरिका यांच्यात दहशतवादाच्या प्रश्नावरील सहकार्य वाढले. अमेरिकेने आंतरराष्ट्रीय पातळीवर दहशतवादाविरुध्द युध्द मोहिम सुरु केली या मोहिमेला भारताने अप्रत्यक्षपणे सहकार्य करीत पाठिंबा दर्शविला. कारण याच काळात भारतीय संसदेवर भीषण हल्ला झाला होता. तसेच भारतात इतर ठिकाणीही दहशतवादी हल्ले झालेले असल्याने भारताच्या परराष्ट्र धोरणामध्ये दहशतवादाचा मुद्दा गंभीर बनला.[7]

**विभागीय महासत्ता बनण्यावर भर**

2004 ते 2014 या काळात विभागीय महासत्ता बनण्याच्या भारताच्या महत्वाकांक्षेवर भर दिला. त्यासाठी भारताने अनेक राष्ट्रांबरोबर, मोठ्या महासत्तांबरोबर संबंध विकसित करुन विभागीय घटनांवर प्रभाव टाकण्याचे प्रयत्न सुरु केले. अमेरिकेचे आणि भारताचे सहकार्य या कालखंडात वाढले. चीनचे लष्करी आधूनिकीकरण, विस्तारवाद, आक्रमकता या कालखंडात वाढल्याने त्यांचे शेजारील सर्वच राष्ट्रांसोबत सीमावाद सुरु झाला. आशिया खंडातील चीनचा विस्तारवाद रोखण्यासाठी भारताला "काउटंरनेट" म्हणून पुढे करण्यास अमेरिकेने सुरुवात केली. आशिया खंडातील सत्तासमतोलाच्या राजकारणात अमेरिकेने भारताला एक विभागीय महासत्ता म्हणून पुढे आणले.[8]

**फास्ट ट्रॅक डिप्लोमसी**

PRINCIPAL
Shivaji College
Hingoli. Dist. Hingoli

2014 नंतर भारतात नरेंद्र मोदी पंतप्रधान झाले. त्यांच्या परराष्ट्र धोरणाला "फास्ट ट्रॅक डिप्लोमसी" म्हणतात. त्यांनी आपल्या धोरणात भारताने आपल्या शेजारील राष्ट्रांशी घनिष्ठ संबंध विकसित करण्यावर भर दिला. कारण भारताची अंतर्गत सुरक्षा ही ह्या राष्ट्रांच्या अंतर्गत सुरक्षेशी निगडीत आहे. या राष्ट्रांकडे दुर्लक्ष झाल्यामुळे येथे चीनचा प्रभाव वाढत गेला आणि ते भारतासाठी धोकादायक आहे. यामुळे भारताने या राष्ट्रांना मोठया प्रमाणावर आर्थिक मदत करण्यास सुरुवात केली. त्याचबरोबर या राष्ट्रांसोबत विविध प्रकारचे करार केले. नेपाळ, भूतान या देशातील साधनसंपत्तीच्या विकासासाठी गुंतवणूक करण्यास सुरुवात केली.

दक्षिणपूर्व आशियाबरोबर आर्थिक संबंध घनिष्ठ करणे यासाठी "लुक ईस्ट" पॉलिसीचे रुपांतर ॲक्ट ईस्ट पॉलिसीमध्ये केले. यामधून आपला आर्थिक व्यापार वाढवण्यावर भर देण्याचे ठरविले.[9]

**चीनच्या वाढत्या सागरी प्रभावाला विरोध**

भारताने प्रामुख्याने दक्षिण चीन समुद्रासाठी केली. कारण जागतिक व्यापारापैकी बराचसा व्यापार हा दक्षिण चीन समुद्रामधून होतो. त्यामुळे तेथे भारतासह सर्वच राष्ट्रांना सागरी स्वातंत्र्य असावे ही मागणी भारताने लावून धरली. तसेच महत्वाच्या समुद्रमार्गाचे रक्षण करणे हे भारताच्या परराष्ट्र धोरणाचे उद्दिष्ट बनले. हिंदी महासागरामध्ये चीनचा वाढत्या हस्तक्षेपाचे प्रतिरोधन करण्याचे भारताने ठरवले. तसेच दहशतवादाचा सामना करण्यालाही प्राथमिकता दिली गेली. सुरक्षा परिषदेतील कायम सदस्य असलेल्या राष्ट्रांशी घनिष्ट संबंध प्रस्थापित करण्यावर भर दिला गेला.[10]

**पब्लिक डिप्लोमसीवर भर**

चीनबरोबर आर्थिक सहकार्य वाढवण्यासाठी प्रयत्न करण्याला प्राधान्य दिले. तसेच पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या विदेश दौऱ्यामध्ये पब्लिक डिप्लोमसीव्दारे विदेशामध्ये स्थायिक झालेल्या भारतीय वंशाच्या लोकांचा उपयोग भारताच्या हितसंबंधासाठी करण्याला प्राधान्य दिले.[11]

**बुध्दीष्ट जगाचे नेतृत्व करण्याचा प्रयत्न**

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी मे 2014 नंतर पंतप्रधानपदाची सूत्रे हाती घेतल्यानंतर भारताच्या परराष्ट्र धोरणाला काही नवे आयाम देण्याचा प्रयत्न केला. त्यांनी चीनच्या प्रभावाचा सामना हा केवळ संरक्षण आणि आर्थिक आघाडयावर न करता सांस्कृतिक क्षेत्रामधील चीनच्या प्रभुत्वाला आणि वर्चस्वाला आव्हान देण्यास सुरुवात केली आहे. यासाठी लोकराज्याचा उपयोग करुन घेतला जात आहे. यासाठी

PRINCIPAL
Shivaji College
Hingoli. Dist. Hing

भारताचे ऐतिहासिक आणि सांस्कृतिक पैलूचा उपयोग करुन घेतला जात आहे. त्यांनी नेपाळ, भूतान आणि जपान या देशाच्या दौऱ्यामध्ये भगवान गौतम बुध्दाचा उल्लेख केला आहे. भगवान बुध्दाचे शांतते विषयीचे योगदान, शांततेबाबतचे विचार, त्यांनी बोलून दाखविले आहेत. तेथे बौध्द धर्मगुरुची भेट घेतली. बुध्द धर्माचा जन्म आणि विकास हा भारता झाला हे सांगून त्यांनी बुध्दीस्ट राष्ट्रांसोबत भारताचे संबंध अधिक दृढ करण्याचा आणि चीनचा प्रभाव कमी करुन त्यांना सांस्कृतिक क्षेत्रात आव्हान देण्याचा प्रयत्न होत आहे.[12]

**दूर्लक्षित देशांकडे लक्ष**

भारताच्या परराष्ट्र धोरणामध्ये आजवर काही देशाकडे दूर्लक्ष झाले होते. या देशाकडे 2014 नंतर या देशांबरोबर घनिष्ठ संबंध प्रस्थापित करण्यास प्राधान्य दिले. व्हिएटनाम, कॅनडा, मंगोलिया या राष्ट्रांशी संबंध वाढवण्यावर भर दिला जात आहे.[13]

**दक्षिण आशियावर भर**

2014 नंतर पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी आपल्या परराष्ट्र धोरणात दक्षिण आशियावर अधिक भर दिला आहे. याचे कारण भारताचा आर्थिक विकास आणि सुरक्षा भारताच्या शेजारी राष्ट्रांशी निगडीत आहे. त्यामुळे शेजारी राष्ट्रांशी दूर्लक्ष करणे वर्तमान स्थितीत योग्य नाही. याचाच फायदा चीनने घेतला आहे आणि या राष्ट्रात मोठया प्रमाणात आर्थिक मदत देऊन भारताला घेरण्याचा प्रयत्न केला आहे. त्यामुळे आता भारत सरकारने या देशांशी संबंध वाढवण्यावर भर दिला आहे.[14]

**निष्कर्ष**

1) शीतयुध्दोत्तर भारताच्या परराष्ट्र धोरणात आर्थिक उद्दिष्टांना महत्व दिल्या जात आहे.
2) भारताने आण्विक विकासाला प्राधान्य दिले आहे.
3) आशिया खंडातील सत्तासमतोलाच्या राजकारणात प्रभावी शक्ती म्हणून भारताला महत्व प्राप्त झाले आहे.
4) पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या फासट ट्रॅक डिप्लोमसीमुळे परराष्ट्र धोरणाला वेगळे स्वरुप प्राप्त झाले आहे.
5) पब्लिक डिप्लोमसीचा वापर पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी मोठया कुशलतेने केला आहे.
6) बुध्दाष्ट जगाचे नेतृत्व करण्यावर भर परराष्ट्र धोरणाव्दारे केला जात आहे.

PRINCIPAL
Shivaji College
Hingoli. Dist. Hingoli

भारताच्या परराष्ट्र धोरणात जागतिक राजकारणातील महत्त्वाचे परंतु त्यांचेद्वारे ... राष्ट्रांशी चांगले संबंध निर्माण करण्यास प्राधान्य दिले जात आहे.

भारताच्या परराष्ट्र धोरणात दक्षिण आशियावर भर दिला जात आहे.

भारताचे परराष्ट्र धोरणाचा विकास टप्प्याटप्प्याने झाला असला तरी त्यावर ऐतिहासिक आणि ...तिक विचारधारेचा प्रभाव कायम राहिला आहे. स्वातंत्र्यपूर्व काळातील परराष्ट्र धोरण, शीतयुध्दकालीन ...ष्ट्र धोरण व शीतयुध्दोत्तर परराष्ट्र धोरणामध्ये जागतिक शांतता, निःशस्त्रीकरण, वसाहतवादाला विरोध, ...तवादाला विरोध याविषयी भारताची भूमिका कायम आहे.

शीतयूध्दकालिन भारताच्या परराष्ट्र धोरणात आदर्शवादाला अत्यंत महत्त्व होते. ते शीतयुध्दोत्तर ...ष्ट्र धोरणात दिसत नाही. शीतयुध्दोत्तर काळातील भारताचे परराष्ट्र धोरण आदर्शवादाऐवजी ...तववादावर आधारलेले आहे. विचारसरणीपेक्षा राष्ट्रीय हितसंबंधांना या काळात महत्त्व प्राप्त झाले. ...बरोबर आर्थिक हितसंबंधांना परराष्ट्र धोरणात महत्त्वाचे स्थान प्राप्त झाले. आर्थिक विकास ...ण्यासाठी परराष्ट्र धोरणाचा उपयोग केला जाऊ लागला. तसेच आण्विक प्रश्न, दहशतवादावर विशेष भर ...ण्यास सुरूवात केला आहे. इंद्रकुमार गुजराल, अटलबिहारी वाजपेयी, मनमोहनसिंग यांच्या काळात ...रतीय परराष्ट्र धोरणात बदल करण्यात आले. 2014 नंतर नरेंद्र मोदी यांच्या पंतप्रधानपदाच्य कालखंडात ...स्ट ट्रॅक डिप्लोमसीध्दारे भारताच्या परराष्ट्र धोरणाला अधिक वास्तववादी बनवण्याचा प्रयत्न केला जात ...आहे. ज्यामुळे भारताविषयी जागतिक स्तरावर सकारात्मक चित्र निर्माण होण्यास, आर्थिक गुंतवणूक ...वाढणे तसेच चीनच्या विस्तारवादाला शह देण्यास मोठे यश प्राप्त झाल्याचे दिसून येते.

## संदर्भसूची

1) देशपांडे, श्रीकांत, (2011) भारताची विदेशनीती, नागपूर, मंगेश प्रकाशन पृ.क्र. 6.
2) देशपांडे, श्रीकांत, (2011) भारताची विदेशनीती, नागपूर, मंगेश प्रकाशन पृ.क्र. 6.
3) डोळे, ना.म., (2006), परराष्ट्र धोरण आपले शेजारी, मुंबई, गंथाली ज्ञानयज्ञ, पृ.क्र. 2.
4) देवळाणकर, डॉ. शैलेंद्र., (2014) भारत आणि जग भारताचे परराष्ट्र धोरण आणि सुरक्षा सम्बंध, पुणे, सकाळ प्रकाशन, पृ.क्र. 13.

PRINCIPAL
Shivaji College
Hingoli. Dist. Hingoli

5) देवळाणकर, डॉ. शैलेंद्र., (2014) भारत आणि जग भारताचे परराष्ट्र धोरण आणि सुरक्षा सम्बध, पुणे, सकाळ प्रकाशन, पृ.क्र. 14.

6) देवळाणकर, डॉ. शैलेंद्र., (2014) भारत आणि जग भारताचे परराष्ट्र धोरण आणि सुरक्षा सम्बध, पुणे, सकाळ प्रकाशन, पृ.क्र. 15.

7) देवळाणकर, डॉ. शैलेंद्र., (2017) भारताचे परराष्ट्र धोरण नवीन प्रवाह, पुणे, सकाळ प्रकाशन, पृ.क्र. 23.

8) देवळाणकर, डॉ. शैलेंद्र., (2017) भारताचे परराष्ट्र धोरण नवीन प्रवाह, पुणे, सकाळ प्रकाशन, पृ.क्र. 23.

9) देवळाणकर, डॉ. शैलेंद्र., (2017) भारताचे परराष्ट्र धोरण नवीन प्रवाह, पुणे, सकाळ प्रकाशन, पृ.क्र. 24.

10) देवळाणकर, डॉ. शैलेंद्र., (2017) भारताचे परराष्ट्र धोरण नवीन प्रवाह, पुणे, सकाळ प्रकाशन, पृ.क्र. 24.

11) देवळाणकर, डॉ. शैलेंद्र., (2017) भारताचे परराष्ट्र धोरण नवीन प्रवाह, पुणे, सकाळ प्रकाशन, पृ.क्र. 25.

12) देवळाणकर, डॉ. शैलेंद्र., (2017) भारताचे परराष्ट्र धोरण नवीन प्रवाह, पुणे, सकाळ प्रकाशन, पृ.क्र. 25.

13) देवळाणकर, डॉ. शैलेंद्र., (2017) भारताचे परराष्ट्र धोरण नवीन प्रवाह, पुणे, सकाळ प्रकाशन, पृ.क्र. 25.

14) देवळाणकर, डॉ. शैलेंद्र., (2017) भारताचे परराष्ट्र धोरण नवीन प्रवाह, पुणे, सकाळ प्रकाशन, पृ.क्र. 25.

PRINCIPAL
Shivaji College
Hingoli. Dist. Hingoli